कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी

तह . - हिंगणा, जिल्हा नागपुर

==========

जा. क्र. /न.प.वा/न.र.वि/भू.नियमी/...९४९

दिनांक : २२/ ०६/२०२१

प्रति,

देवीकर लॅंड डेव्हलपर्स तर्फे भागीदार,
श्री. पंडित शंकरराव देवीकर,
रा. नवीन सुभेदार, जि. नागपूर

विषय : महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारित) अधिनियम, २०२१ अन्वये अभिन्यास / ले-आउट ला नियमितीकरण करणे.
मौजा वानाडोंगरी प.ह.न. ४६ येथील खसरा क्र. १४०, १६५/१, १६५/३ आराजी २.८० हे.आर. अभिन्यासातील भूखंड निवासी प्रयोजनार्थ नियमितीकरणास मंजुरी मिळणेबाबत.

संदर्भ : १) श्री. पंडित शंकरराव देवीकर, रा. नवीन सुभेदार, जि. नागपूर यांचा अर्ज क्र. २८२८ दिनांक २०/०७/२०२१.
२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार , शुक्रवार १२ मार्च २०२१ / फाल्गुन २१ शके १९४२ अन्वये.
३) आदेश क्र. अंनवा/ १०२०/४८०/प्र.क्र. ७९/भाग -२/नवि-२०/ मुंबई – ३२ दिनांक १८/०५/२००१
४) सर्वसाधारण किरकोळ पावती क्र. ५८२१ दिनांक २२/०७/२०२१ अन्वये.

आपण संदर्भित अर्ज क्र. १ नुसार मौजा वानाडोंगरी प.ह.न. ४६ येथील खसरा क्र. १४०, १६५/१, १६५/३ आराजी २.८० हे.आर. अनधिकृत अभिन्यासास **श्री. पंडित शंकरराव देवीकर, रा. नवीन सुभेदार, जि. नागपूर** यांनी निवासी भूखंड प्रयोजनार्थ महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारित) अधिनियम २०२१ अन्वये नियमितीकरण मंजूर करणेबाबत विनंती केलेली आहे. संदर्भ क्र. ४ नुसार प्रकरण छानणी शुल्क, प्रशमन शुल्क व विकास आकार चा भरणा पावती क्र. ५८२१ दिनांक २२/०७/२०२१ अन्वये रु. १८,७३,८८५/- अन्वये भरणा केलेला आहे. करिता या कार्यालयास सादर केलेला अनधिकृत अभिन्यासाचा / ले-आऊट चा नकाशा एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे तसेच महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारित) अधिनियम २०२१ चे कलम ५ (१) अन्वये खालील नियम, अटी व शर्तीस अधीन राहून भूखंड नियमितीकरण करण्यात येत आहे .

नियम, अटी व शर्ती :

१) सोबत जोडलेल्या भूखंड नियमितीकरण नकाशानुसार उप अधीक्षक, भूमी अभिलेख, हिंगणा यांचेकडून जागेची अंतिम आखणी करून घ्यावी. आखणी केलेल्या रेखांकनाची मोजणीची 'क' प्रतिच्या मूळ प्रत सादर करावे.

२) भूखंड नियमितीकरण निवासी भूखंड या रहिवासी प्रयोजनार्थ नियमितीकरण केलेली आहे. त्याखेरीज इतर वापर अनुज्ञेय होणार नाही.

३) भविष्यात भूखंडाचे विभाजन करता येणार नाही.

४) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४७ अ अन्वये नमुद केलेल्या दराने रूपांतरण करण्याचा आणि त्याबद्दलचा अकृषिक सारा आकारणीचा भरणा करून महसूल अधीकाऱ्याकडून सनद प्राप्त करून घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

५) भूखंडावर असलेले/ करावयाचे बांधकामास प्रादेशिक योजना किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४४, ४५ व महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक वसाहत अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये या कार्यालयाकडून मंजूरी प्राप्त करून घेण्यात यावी.

६) विषयाकित जमिनीतून विद्युत वाहिनी दूरध्वनी वाहिनी प्रवाहित होत असल्यास उक्त वाहिनीचे प्रवाहाला बाधा होणार नाही, अशा रितीने संबंधित विभागाच्या अद्यावत नियमानुसार आवश्यक त्या सामासिक अंतरावर स्थानातरित करावे लागेल.

७) अभिन्यासामध्ये अस्तित्वात असेलेले १०% खुली जागा (२८००.७५ चौ.मी.) व रोड ची जागा (६०५५.९४ चौ.मी) कायम राखून त्याचा विकास करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

८) विषयांकित जमिनीतून जमिनीलगत जल वाहिनी पाण्याचे स्त्रोत प्रवाहित होत असल्यास संबंधित विभागाचे/ पाटबंधारे / जल सिंचन विभागाचे ना - हरकत घ्यावे लागेल.

९) पावसाच्या पाण्याचे जलसंवर्धन (Rain - Water Harvesting) ची व्यवस्था अभिन्यासात करावी लागेल.

१०)जमिनीचे मालकी हक्काबाबत महसूल विभागाचे स्तरावरून खात्री करून घेणे आवश्यक राहील.

११)अभिन्यासात सार्वजनिक पाणी पुरवठ्याची व सांडपाण्याची प्रक्रिया (Water Treatment Plant) करून विल्हवाट करण्याची व्यवस्था जमीन मालक / विकासक यानी स्वखर्चाने करणे आवश्यक राहील.

१२)उक्त अभिन्यासातील सेवा मार्ग व इतर रस्ते विकसित करून सेवा मार्ग नगर परिषद वानाडोंगरीला विनामूल्य हस्तांतरित करणे बंधनकारक राहील.

१३)सद्यस्थितीत सदर रेखांकनामधील विद्यमान प्रस्तावित बांधकामास प्रादेशिक योजनेच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावली नुसार सदर जागेत सामान्यत: १.१० इतका चटई क्षेत्र निर्देशांक लागु राहील. अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशाक प्रीमियम अदा करून मंजूर करून घेणे बंधनकारक राहील.

१४)उक्त जागा नवनिर्मित नगर परिषद वानाडोगरी क्षेत्रात समाविष्ट झालेली असल्याने नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्राकरिता लागू एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहनात्मक नियमावलीच्या तरतुदी लागु असतील.

१५)विद्यमान प्रस्तावित इमारतींच्या सभोवताल एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार सामासिक अंतर सोडणे व राज्य रस्त्यावरील मुख्य जिल्हा मार्ग इतर जिल्हा मार्ग यावरील स्थित इमारती करीता महामार्गाचे नियमानुसार अन्तर सोडणे बंधनकारक राहील. विद्यमान प्रस्तावित इमारतीची उंची लागू एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या तरतुदी लागु असतील.

१६)प्रस्तावित भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

प्लॉट क्र.	साईझ (size)	क्षेत्रफळ (चौ.मी)	Tangent	एकूण भूखंड संख्या	निव्वळ क्षेत्रफळ (चौ.मी.)	अनुज्ञेय बांधकाम
१	१/२(४७.९१ +४१.६२९) x २४.२२ १/२(४१.६२९+३८.७२०)x ७.८६५	१४००.३९	--	१	१४००.३९	१.१०
२	१/२(३८.७२० +२६.००) x ३४.३९	१११३.०२	१.७८३	१	१११३.०२	१.१०
३	१/२(९.८९४ +२०.६५४) x १७.००	२५९.६५८	१५.१६	१	२४४.४९४	१.१०
४ ते ९	९.१४ x १७.००	१५५.३८	--	६	१५५.३८	१.१०
१०	१/२(९.११ +१०.९१) x १७.००	१७०.१७९	--	१	१७०.१७९	१.१०
११	१/२(९.१४ + १०.९४१) x १७.००	१७०.६८९	--	१	१७०.६८९	१.१०
१२	९.१४ x १७.००	१५५.३८	--	१	१५५.३८	१.१०
१३	१६.३२ x १७.००	२७७.४४	४.३५	१	२७३.०९	१.१०
१४	१०.५० x १७.००	१७८.५०	४.३५	१	१७४.१५५	१.१०
१५ व १६	९.१४ x १७.००	१५५.३८	--	२	१५५.३८	१.१०
१७	१/२(७.७१७ +७.५१७) x १७.०० १/२(१६.५५७+१७.००)x१.६२३	१५५.०२१	--	१	१५५.०२१	१.१०
१८	१/२(१३.६३५+१६.५५७)x १०.७२	१६१.८२९	--	१	१६१.८२९	१.१०
१९	१/२(५.०५६+२१.३३७)x ३२.९१२	४३४.३२३	११.०९	१	४२३.२२९	१.१०
२०	७.६६० x १५.००	११४.९०	--	१	११४.९०	१.१०
२१ ते २४	७.६२ x १५.००	११४.३००	--	४	११४.३००	१.१०
२५	१०.५० x १५.००	१५७.५०	४.३५	१	१५३.१५५	१.१०
२६	१६.३२ x १५.००	२४४.८००	४.३५	१	२४०.४५५	१.१०
२७	९.१४ x १५.००	१३७.१००	--	१	१३७.१००	१.१०
२८	१/२ (७.५५१+९.१४) x १५.००	१२५.१८३	--	१	१२५.१८३	१.१०
२९	१/२ (११.१८+१२.१५) x १०.००	११६.६५	--	१	११६.६५	१.१०
३० ते ३४	९.१४ x १५.००	१३७.१००	--	५	१३७.१००	१.१०
३५	१/२ (७.११०+१५.००) x १४.५३४ १/२ (४.५५२+१६.५३७)	१९८.३१२	०.९५७	१	१९७.३५५	१.१०
३६	१०.५० x १८.११०	१९०.१५५	४.३५	१	१८५.८१	१.१०
३७	९.१४ x १८.११०	१६५.५२५	--	१	१६५.५२५	१.१०
३८	७.८४२ x १८.११०	१४२.०१९	--	१	१४२.०१९	१.१०

३९ ते ४३	७.८० x १८.११०	१४१.२५८	--	१	१४१.२५८	१.१०
४४ ते ४८	७.८० x १८.५०	१४४.३००	--	५	१४४.३००	१.१०
४९	७.८४२ x १८.५०	१४५.०७७	--	१	१४५.०७७	१.१०
५०	९.१४ x १८.५०	१६९.०९०	--	१	१६९.०९०	१.१०
५१ व ५२	१०.५० x १८.५०	१९४.२५०	४.३५	२	१८९.९०	१.१०
५३	९.१४ x १८.५०	१६९.०९०	--	१	१६९.०९०	१.१०
५४	७.८४२ x १८.५०	१४५.०७७	--	१	१४५.०७७	१.१०
५५ ते ५९	७.८० x १८.५०	१४४.३००	--	५	१४४.३००	१.१०
६० ते ६४	७.८० x १५.२४	११८.८७२	--	५	११८.८७२	१.१०
६५	७.८४२ x १५.२४	११९.५१२	--	१	११९.५१२	१.१०
६६	९.१४ x १५.२४	१३९.२९४	--	१	१३९.२९४	१.१०
६७ व ६८	१०.५० x १५.२४	१६०.०२	४.३५	१	१५५.६७५	१.१०
६९	९.१४ x १५.२४	१३९.२९४	--	१	१३९.२९४	१.१०
७०	७.८४२ x १५.२४	११९.५१२	--	१	११९.५१२	१.१०
७१ ते ७५	७.८० x १५.२४	११८.८७२	--	५	११८.८७२	१.१०
७६ ते ७९	६.०० x १५.००	९०.००	--	४	९०.००	१.१०
८०	९.१४ x १५.००	१३७.१००	--	१	१३७.१००	१.१०
८१ ते ८५, ८७	७.५० x १५.००	११२.५००	--	६	११२.५००	१.१०
८६	९.१४ x १५.००	१३७.१००	--	१	१३७.१००	१.१०
८८ ते ९१	७.५० x १५.००	११२.५००	--	४	११२.५००	१.१०
९२ ते ९७	९.०० x १५.००	१३५.००	--	६	१३५.००	१.१०
९८	१/२ (१५.००+९.४९५) (१५.०० x १०.८४३) (३.१२२ x २०.६५४)	२५५.९८८	०.४१८	१	२५५.५७०	१.१०
९९	१६.०० x १८.००	२८८.००	४.३५	१	२८३.६५५	१.१०
१००	१०.०० x १८.००	१८०.००	--	१	१८०.००	१.१०
१०१ ते १०४	८.१३ x १८.००	१४६.३४	--	४	१४६.३४	१.१०
१०५	१/२ (७.८२८+१९.२२) x १८.००	२४३.४३२	१५.१६	१	२२८.२६८	१.१०

एकूण : १७६८८.८४४चौ.मी.

१७)सदर जागेतील बांधकामाकरिता Maharashtra Fire Prevention and Life Safety Measure Act, 2006 नुसार Advisor / Chief Fire Officer कडील ना - हरकत मंजूरी प्राप्त करून सादर करणे आवश्यक राहील.

रेखांकनातील जागेत विद्यमान वृक्ष असल्यास अभिन्यास आखणी करताना ते नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवणे बंधनकारक राहील.

१८)रेखांकनातील जागेत प्रती १००.०० चौ.मी. क्षेत्रफळास एक याप्रमाणे रस्त्यालगत खुल्या जागेत वृक्षाची लागवड करावी. जेणेकरून पर्यावरणाचा समतोल राखता येईल.

१९)मोक्यावर वृक्षाची विद्यमानता विचारात घेता प्रस्तुत प्रस्तावाची मोक्यावर आखणी करण्यात यावी.

२०)प्रकरणी **प्रशमन शुल्क व विकास आकार** याबाबत शासन / विभागाकडे यापुढे कोणताही निर्णय झाल्यास प्रशमन शुल्क व विकास आकार बाबतची थकबाकी शासनाकडे अर्जदारास भरणा करणे बंधनकारक राहील.

२१)नियमानुसार जागेचे **विकास शुल्क व प्रशमन शुल्क परीगणित** करतांना अनावधाने रक्कम कमी आकारण्यात आल्यास फरकाची रक्कम अर्जदाराकडून वसूल करण्यास या कार्यालयास अधिकार राहील.

२२)महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारित) अधिनियम २०२१ चे कलम ५ (१) नुसार महसूल अधिकारी यांचेकडून सनद प्राप्त करून घ्यावे लागेल.

२३)वरील अटींची पूर्तता करतांना रेखाकनात काही फेरबदल झाल्यास सुधारित रेखाकनास नगर परिषदेची मंजूरी प्राप्त करून घ्यावी लागेल विना मंजुरीने केलेले कोणतेही बदल मान्य होणार नाही.

उपरोक्त भूखंड नियमितीकरण हे नियोजनाचे दृष्टीने करण्यात आली असून जागेचे मालकी हक्क व इतर तदनुशांगिक अभिलेख या बाबत आपले शासन स्तरावरून खात्री करून घेण्यात यावी. सदर प्रकरणी भूखंड नियमितीकरण करण्यात येत असलेले रेखांकनाची एक प्रत या कार्यालयाचे अभिलेखी ठेवून उर्वरित दोन प्रती यासोबत पाठविण्यात येत आहेत.

सहपत्र – १) वरील प्रमाणे

नगर परिषद वानाडोंगरी
९४९
२३/०६/२०२१

मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी

प्रतीलीपी माहिती व कार्यावाहीस्तव सविनय अग्रेषित.

१) मा. तहसीलदार, हिंगणा यांना उक्त नियमितीकरण केलेल्या रेखांकनाचे प्रतीसह आवश्यक त्या कार्यावाहीस्तव अग्रेषित.

२) मा. उप अधीक्षक, भूमी अभिलेख, हिंगणा यांना उक्त नियमितीकरण केलेल्या रेखाकनाचे प्रतीसह मोक्यावर आखणी करण्यास्तव आवश्यक त्या कार्यावाहीस्तव अग्रेषित.

— ९-५१ —

मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी